दैनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● सोमवार दि.४ ऑगस्ट २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २४९ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Monday 4 August 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 249 ● Pages 4 ● Rate 4 Rs

प्रतिनिधी नेमणे आहे

लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.

# हिंदु, सनातन धर्माचा अपमान करणाऱ्यांना किंमत चुकवावी लागेल-एकनाथ शिंदे

## एकनाथ शिंदे काँग्रेस नेत्यांवर संतापले; उद्धव ठाकरेंचे मतांसाठी सोयीचे हिंदुत्व

**मुंबई (वृत्तसंस्था)-हिंदु आणि सनातन धर्माचा अपमान करणाऱ्यांना त्याची किंमत चुकवावी लागेल, असा इशाराच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला आहे. काँग्रेस नेत पृथ्वीराज चव्हाण यांच्या वक्तव्यावर त्यांनी संताप व्यक्त केला आहे. इतकेच नाही अशा वेळी उद्धव ठाकरे यांना हिंदुत्व आठवत नाही का? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. ठाकरेंचे केवळ मतांसाठी असलेले सोयीचे हिंदुत्व असल्याचा आरोप देखील त्यांनी केला.हिंदुधर्म आणि सनातन धर्म कधीही कोणावर अन्याय करत नाही. हा धर्म सहिष्णू आहे, सहन करणारा आहे. म्हणून हा खऱ्या अर्थाने हिंदुत्व आणि सनातन धर्माचा अपमान करणाऱ्यांना याची किंमत त्यांना चुकवावी लागेल. काँग्रेसचे नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी हिंदु धर्माचा अपमान करणारे वक्तव्य केलेले आहे. त्याना याची किंमत मोजावी लागेल, असा इशारा देखील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला आहे.**



आम्ही हिंदुत्व सोडले नाही, असे म्हणणारे आता कुठे गेले? असा प्रति प्रश्न देखील एकनाथ शिंदे यांनी उपस्थित केला. एवढ्या मोठ्या वक्तव्यावर एकही भ्र न काढणे हे कसे शक्य आहे? असा प्रश्न एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना विचारला आहे. त्यामुळेच बाळासाहेब ठाकरे यांचे खरे हिंदुत्व आम्ही पुढे घेऊन चाललो आहोत, असा दावा देखील एकनाथ शिंदे यांनी केला आहे. ज्यावेळी भगव्या वर वार होईल, त्यावेळी त्याला उत्तर देण्याचे काम आमची शिवसेना करेल, असे देखील शिंदे यांनी म्हटले आहे.राहुल गांधी नेहमीच सावरकर आणि हिंदुत्वाचा अपमान करतात. आता ऑपरेशन सिंदूरचा आणि प्रधान मंत्र्यांचा देखील त्यांनी अपमान केला आहे. पाकिस्तानला धडा शिकवला, त्यामुळेच त्यांना पोट दुखी आली असल्याचे शिंदे यांनी म्हटले आहे. त्यामुळेच ते रोज किती विमान पडले? याचा हिशोब विचारत आहेत. दहशतवाद्यांच्या बॉम्ब स्फोटात किती शहीद झाले? याचा हिशोब विचारण्याची हिंमत नाही का? असा प्रश्न त्यांनी विचारला. राहुल गांधी नेहमीच सावरकरांचा अपमान करतात आणि उबाठा ते सहन करते. उबाठाचे नेते राहुल गांधींच्या मांडीला मांडी लावून बसतात. याचा जाब जनता विचारल्याशिवाय राहणार नाही. म्हणून यांचे सोयीचे हिंदूच आहे. मतांसाठी हिंदुत्व धरायचे आणि सोडायचे, हे सर्व जनतेसमोर आले आहे. त्यांचा खरा चेहरा आता दिसला असल्याचेही शिंदे यांनी म्हटले आहे.

# शिरूर शहरात उपजिल्हा रुग्णालय उभारण्यात यावे यासाठी मा.मंत्री माधुरीताई मिसाळ यांच्या कडे मागणी

**पुणे । भाऊसाहेब पंधरकर**



शिरूर शहरात शंभर खाटांचे उपजिल्हा रुग्णालय मंजूर करण्यात यावे अशी मागणी नगरविकास,परिवहन व वैद्यकीय शिक्षण मंत्री माधुरीताई मिसाळ यांना निवेदन देऊन केली असल्याचे शिरूर शहर भाजपचे चिटणीस राजेंद्र महाजन यांनी सांगितले.

यावेळी त्यांच्यासमवेत जगताप उपस्थित होते.महाजन यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,शिरूर शहरासह तालुक्याची लोकसंख्या विचारात घेऊन तसेच शेजारील पारनेर व श्रीगोंदा तालुक्यातील नागरिकांना उपचारासाठी शिरूर हे जवळचे ठिकाण असल्याने शहरात सर्व सोयीसुविधांनीयुक्त शंभर खाटांचे उपजिल्हा रुग्णालय लवकरात लवकर मंजूर करण्यात यावे. शहरालगत मोठी रांजणगाव कारेगाव हद्दीत एमआयडीसी असून करडे घाटात देखील इलेक्ट्रॉनिक हब होत असल्याने येथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. शहराला लागून असलेल्या पुणे - अहिल्यानगर या महामार्गवरून मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते.या महामार्गावर अनेकवेळा मोठ्या व लहान प्रमाणात अपघात होत असून अनेकांना वेळेत उपचार न मिळाल्याने जीव गमवावा लागला असल्याच्या दुर्दैवी घटना घडलेल्या आहेत. शहरातील ग्रामीण रुग्णालयात पाहिजे त्या प्रमाणात सुविधा उपलब्ध नसल्याने रूग्णांना डमिट करुन न घेता इतरत्र नेण्याचा सल्ला दिला जातो. ग्रामीण रुग्णालयात गंभीर आजाराचे, अपघातग्रस्त रुग्ण नियमित येत असतात. या सर्व बाबी व लोकसंख्या विचारात घेऊन शिरूर शहरात उपजिल्हा रुग्णालय मंजूर करण्यात यावे अशी मागणी निवेदनातून करण्यात आली असल्याचे शिरूर शहर भाजपचे चिटणीस राजेंद्र महाजन यांनी सांगितले.

## आंदोलनाचे शास्त्र शिवसैनिकांना कळले पाहिजे

# आंदोलन करणे हे जिवंतपणाचे लक्षण आहे-सुषमा अंधारे

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना उपनेत्या तथा प्रवक्त्या सुषमाताई अंधारे यांनी आज जिल्हाप्रमुख उल्लास गिराम यांच्या जनसंपर्क कार्यालयास भेट दिली. आगामी निवडणुकी संदर्भात शिवसैनिकांशी सवांद साधला. ज्या ठिकाणी अन्याय, अत्याचार, सामान्य लोकांचे मूलभूत प्रश्न पायदळी तुडवली जातात तेव्हा लोकशाहीला साजेशी आंदोलने झाली पाहिजेत. शिवसैनिकांना आंदोलनाचे शास्र कळले पाहिजे, आंदोलन करणे जिवंतपणाचे लक्षण असल्याचे यावेळी सुषमा ताई अंधारे यांनी शिवसैनिकांना सांगितले.



जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे कौतुक सुषमाताईंनी केले. जिल्हाप्रमुख पदाच्या आजपर्यंतच्या कार्याची माहिती घेतली. शिवसैनिक व जिल्हाप्रमुख म्हणून मन - मेंदू - मनगट या सर्व बाबी उल्हास गिराम यांच्या बाबतीत परिपूर्ण असल्याचे ताईंनी सांगितले. दर वेळी हमारीतुंबरी वर येऊन शिवसैनिकांनी काम न करण्याचा सल्ला ही शिवसैनिकांना या वेळी सुषमा ताई अंधारे यांनी दिला. नळ - गटार - रस्ते या तीन कामावर लक्ष केंद्रित करून आंदोलने करा. या पूर्वी संपूर्ण मराठवाड्यात आपण पाणी प्रश्नावर आंदोलने केली यांची दखल या सरकारला घ्यावी लागली असल्याचे ताई म्हणाल्या. यावेळी जिल्हाप्रमुखासह शिसैनिकांनी ताईचा आदर सत्कार केला. यावेळी ज्येष्ठ शिवसैनिक तथा माजी पं. स. विलास महाराज शिंदे, महिला संघटिका मीराताई नवले, जिल्हा संघटक संजय महाद्वार,जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, जिल्हा संघटक नितीन धांडे, विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे,उपजिल्हाप्रमुख अजिनाथ खेडकर,तालुकाप्रमुख सोपान काका मोरे, केज तालुकाप्रमुख अशोक जाधव, कामगार सेनेचे रवि वाघमारे, माजी पंचायत समिती सदस्य नवनाथ प्रभाळे, पंकज कुटे, उपसरपंच प्रदीप कोटुळे, गणेश लोणकर, राजाभाऊ हुरकुडे, दादा साहेब सोनवणे, सतीश परदेशीं, दिलीप पवार

# बँकेसमोरील पुरातन विहीर बुजवण्याच्या विरोधात चार दिवसांपासून आमरण उपोषण

## खासदार बजरंग सोनवणे यांची उपोषण स्थळी भेट

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**




शहरातील महाराष्ट्र बँके शेजारी जुनी पुरातन विहीर अनेक वर्षापासून होती.ही विहीर नगर परिषदेने बुजवुन त्या ठिकाणीअनाधिकृतपणे गाळे बांधकाम करुन ते भाडेतत्वावर दिलेले आहेत.सदरील जागेवरील अतिक्रमण काढून विहीर मोकळी करुन विहीर पुर्ववत सुरु करावी या मागणी साठी नगरपालिकेसमोर लोकजनशक्ती पार्टीच्या कार्यकर्त्यांने उपोषण सुरु केले आहे.या उपोषणास खा.बजरंग सोनवणे यांनी रविवार भेट दिली.

महाराष्ट्र बँकेसमोर असलेली विहीर बुजवून त्याठिकाणी सुरु केलेले गाळे बंद करुन विहीर मोकळी करण्यासाठी नगर पालिकेला निवेदन देण्यात आले होते. तसेच सर्व अंबाजोगाई शहरामध्ये भिक मांगो आंदोलन करण्यात आले होते.परंतु नगर परिषदेने याची दखल न घेता सदर अतिक्रमण अद्यापपर्यंत काढलेले नाही.या विरोधात लोकजनशक्ती पार्टी युवक आघाडीचे बीड जिल्हाध्यक्ष अशोक बन्सी काळे पाटील यांनी मागील चार दिवसांपासून आमरण उपोषण सुरु केले आहे. मागील चार दिवसा पासून तोडगा निघाला नसल्याने आमरण उपोषण सुरुच आहे. पुरातन वारसा असलेल्या विहिरीच्या जपणुकीसाठी सुरु असलेला हा लढाअत्यंत महत्त्वाचा आहे. लोकशाही मार्गाने प्रश्न मांडणाऱ्या प्रत्येकाच्या पाठीशी खंबीरपणे उभं राहीले पाहीजे हे ओळखून खा.बजरंग सोनवणे यांनी उपोषण कर्ते अशोक बन्सी काळे पाटील यांची उपोषण स्थळी जाऊन चौकशी केली.यावेळी खा.सोनवणे यांच्या बरोबर माजी आ. पृथ्वीराज साठे,राष्ट्रवादी गटाचे तालुकाध्यक्ष अमर देशमूख,लोकजन शक्ती पार्टीचे राजेश वाव्हुळे, इस्माईलगवळी, मदनलाल परदेशी,रवी देशमुख,हमीद चौधरी, गणेश घाडगे इत्यादी उपस्थित होते. खा.बजरंग सोनवणे यांनी उपोषण स्थळी भेट दिल्यानंतर नगर पालिकेच्या वतीने स्वच्छता निरीक्षक अनंत वेडे यांनी उपोषणकर्ते अशोक बन्सी काळे पाटील यांना मुख्याधिकारी यांनी दिलेले लेखी पत्र दिले.परंतू दिलेल्या पत्रात विहीरीवरील अतिक्रमण काढणार म्हणून ठोस आश्वासन दिलेले नाही.यामुळे उपोषण मरेपर्यंत सुरु राहील असेउपोषणकर्ते काळे यांनी लेखी दिले आहे.

# वंचित बहुजन आघाडीच्या वतीने हल्लाबोल मोर्चा संपन्न

## ॲड.बाळासाहेब आंबेडकर हेच सर्व सामान्यांचे तारणहार-प्रा.किसन जाधव

**बीड । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील नागरीकांच्या विविध मागण्यांकरीता पाटोदा तहसील वर मोर्चा काढण्यात आला होता . वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश महासचिव प्रा. किसन चव्हाण आणि जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांच्या नेतृत्वाखाली पाटोदा तालुक्यातील जनतेच्या विविध मागण्यांसंदर्भात हल्लाबोल मोर्चा संपन्न झाला.

या मोर्चात पाटोदा मतदार संघातील गाव खेड्यातील बंधु भगिणी सह शेकडो कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष सचिन मेघडंबर , पुरुषोत्तम वीर, भारत तांगडे, अंकुश जाधव, शिरूर तालुका अध्यक्ष दिलीप माने यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा व तालुका पदाधिकारी तसेच महिला कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. हल्लाबोल मोर्चाचे आयोजन पाटोदा तालुकाध्यक्ष बाळासाहेब गायकवाड यांच्यासह पदाधिकारी यांनी केले . या यशस्वी मोर्चाचे आयोजन पाटोदा तालुका अध्यक्ष बाळासाहेब गायकवाड यांनी केले होते.



# हुरुप वाढविणारी गुंतवणूक



जपान हा भारतातला पाचव्या क्रमांकाचा गुंतवणूकदार आहे. भारतात दीड हजारांवर जपानी कंपन्या उत्पादन, व्यवसाय करीत आहेत. भारत आणि जपान यांचा व्यापार जपानच्या बाजूने झुकलेला असला तरी गेली १५ वर्षे तो वाढतो आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने यंदा मार्चमध्ये उद्योग खात्याच्या अखत्यारीत वेगळा 'जपान कक्ष' स्थापन केला. तसेच, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही काही महिन्यांपूर्वी जपानचा यशस्वी दौरा केला. या पार्श्वभूमीवर टोयोटा-किर्लोस्कर आणि महाराष्ट्र सरकार यांच्यात बुधवारी झालेल्या कराराकडे पाहावे लागेल.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटल्याप्रमाणे याने राज्यातील मोटर निर्मिती उद्योगात क्रांती होईलच; पण मराठवाड्यात रोजगार निर्मिती आणि आनुषंगिक उद्योगांनाही चालना मिळेल. महाराष्ट्रात बहुतेक जागतिक कार उत्पादकांनी कारखाने उभारले आहेत. त्यात टोयोटाचीच कमी होती. टोयोटाचा हा छत्रपती संभाजीनगरमध्ये होत असलेला प्रकल्प विजेवर चालणारी आणि हायब्रीड वाहने तयार करणार असल्याने त्याचे विशेष महत्त्व आहे. हा करार होत असतानाच राज्याच्या मंत्रिमंडळाने आदल्याच दिवशी ८१ हजार कोटींच्या सात नव्या प्रकल्पांनाही मंजुरी दिली आहे. यातल्या दोन प्रकल्पांकडे विशेष लक्ष वेधायला हवे. पहिला नवी मुंबईत सेमी कंडक्टर बनविणारा आणि दुसरा फळांच्या रसावर प्रक्रिया करणारा रत्नागिरी जिल्ह्यातील कोका कोलाचा प्रस्तावित प्रकल्प. करोना काळात भारताने सेमी कंडक्टरच्या उत्पादनात स्वयंपूर्ण होण्याचा निर्धार केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यात विशेष लक्ष घातले आहे. मात्र, महाराष्ट्रात होणारा वेदांत-फॉक्सकॉनचा सेमी कंडक्टर प्रकल्प गुजरातेत गेल्याने या क्षेत्रात महाराष्ट्र जरा अडकल्यासारखा झाला होता. आता नवी मुंबईतील प्रकल्प वेगाने सुरू व्हायला हवा. भाजप-शिवसेना युतीचे सरकार असताना सन २०१७ मध्ये जे नवे अन्न प्रक्रिया धोरण आले; त्यात एकीकडे केळी, आंबा, पेरू, द्राक्षे यांच्यासहित फळांवरचे प्रक्रिया उद्योग तर दुसरीकडे, कांदा, वांगे, फ्लॉवर, कोबी यांच्यासहित भाज्यांवरील प्रक्रिया उद्योग अपेक्षित आहेत. फलोत्पादन व भाजी उत्पादन यांत महाराष्ट्रातील शेतकरी नवनवे विक्रम करीत असताना या उत्पादनांवर त्या प्रमाणात प्रक्रिया उद्योग मात्र उभे राहात नव्हते. रत्नागिरीतील प्रस्तावित प्रकल्पाचे त्यामुळे विशेष महत्त्व. असे आणखी प्रकल्प व्हायला हवेत.गेल्या काही काळात महाराष्ट्रातील गुंतवणूक गुजरातेत जाते की काय, अशी चर्चा सुरू झाली होती. केंद्र सरकारच्या आकडेवारीत एकूण गुंतवणूक तसेच परदेशी उद्योग यांत महाराष्ट्र कायमच पहिल्या क्रमांकावर राहिला आहे. मात्र, महाराष्ट्रासमोर आज गुंतवणुकीइतकेच आव्हान नवे रोजगार निर्माण करण्याचे आहेत. आधुनिक उद्योग येतात तेव्हा गुंतवणूक व रोजगारनिर्मिती यांचे प्रमाण व्यस्त असते. सन २०२३ आणि २४ मध्ये मिळून दावोस येथील परिषदेत ४५ सामंजस्य करार झाले. दावोसमधील हे करार मार्गी लागले तर साडेचार लाख कोटी रुपयांची गुंतवणूक येईल आणि दोन लाखाच्या आसपास थेट रोजगार निर्माण होतील. कोणत्याही उद्योगात एक थेट रोजगार निर्माण होतो, तेव्हा तीन ते चार आनुषंगिक रोजगार निर्माण होतात. सध्या राज्यात मराठा आंदोलनासहित जी विविध आंदोलने चालू आहेत, त्यांच्या मागे रोजगारांची भूक हे महत्त्वाचे कारण आहे. जितके नवे उद्योग येतील, तितकी ती भागेल.महाराष्ट्राच्या औद्योगिक नकाशावर नजर टाकली तर पुणे-मुंबई-नाशिक हा त्रिकोण आणि काही प्रमाणात छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर हाच टापू विकासाच्या परिघात आला आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूर झालेले प्रकल्प रत्नागिरी, पनवेल, रायगड, बुटीबोरी एमआयडीसी, महापे.. आदी ठिकाणी होणार, ही स्वागतार्ह बाब आहे. राज्य सरकारने देशातील किंवा परदेशातील गुंतवणूकदारांना कमी विकसित जिल्ह्यांमध्ये जाण्यास प्रवृत्त केले पाहिजे. उद्या वाढवण बंदराचा ७८ हजार कोटींचा प्रकल्प वेळापत्रकानुसार झाला आणि मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गाप्रमाणेच रत्नागिरी-नागपूर शक्तिपीठ महामार्ग मार्गी लागला तर महाराष्ट्राचा औद्योगिक विकास अधिक विकेंद्रित होईल. महाराष्ट्राच्या औद्योगिक आणि व्यापारी वाटचालीवर राज्यातील राजकीय धुळवडीचा परिणाम होऊ न देणे, ही सर्वांची जबाबदारी आहे. त्याचप्रमाणे, राज्यात येणाऱ्या नव्या उद्योगांना खंडणीखोरीचा त्रास होणार नाही, याची काळजी सरकारने घ्यायलाच हवी. एखादा वाहन उद्योग छोट्या राज्यात गेला की वर्षानुवर्षे कौतुक होते. पण महाराष्ट्रात देशातील २० टक्क्यांपेक्षा जास्त वाहन उत्पादन होते आणि चार हजारांपेक्षा जास्त छोटे-मोठे उद्योग चालतात. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था एक लाख कोटी डॉलरची व्हायची तर सर्वच क्षेत्रातील वाढीचा हा वेग वाढायला हवा.

# ओझोनमुळे कोंडला महानगरांचा श्वास



उन्हाळ्यात प्रमुख महानगरांमध्ये जमिनीजवळील ओझोन प्रदूषण लक्षणीयरीत्या वाढले. गेल्या वर्षीच्या उन्हाळ्याच्या तुलनेत ही २९ टक्के वाढ आहे. मार्च ते मे २०२५ दरम्यान ३१ दिवसांसाठी ओझोनची पातळी मानकांपेक्षा जास्त होती.सेंटर फॉर सायन्स अॅण्ड एन्व्हायर्नमेंट'च्या माहितीनुसार २०२५च्या उन्हाळी हंगामात प्रमुख महानगरांमध्ये जमिनीजवळील ओझोन प्रदूषण लक्षणीयरीत्या वाढले. कोलकाता, बंगळूरु, मुंबई, हैदराबाद आणि चेन्नईमध्ये सरासरी आठ तासांच्या कालावधीसाठी ओझोन पातळी मानकांपेक्षा जास्त दिवस अधिक नोंदवली गेली. एकाच वेळी अनेक प्रदूषकांच्या आव्हानामुळे लहान मुलांसह नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे.

'एअर क्वालिटी ट्रॅकर' उपक्रमांतर्गत 'सीएसई'च्या अर्बन लॅबने केलेल्या नवीनतम वायू गुणवत्ता विश्लेषणात आढळून आले, की प्राथमिक प्रदूषकांच्या विपरीत ओझोन थेट स्रोतातून उत्सर्जित होत नाही. वाहने, वीज प्रकल्प, कारखाने आणि इतर ज्वलनशील स्रोतांमधून उत्सर्जित होणारे नायट्रोजन ऑक्साईड (एनओएक्स), अस्थिर सेंद्रिय संयुगे आणि कार्बन मोनोऑक्साइड यांच्या सूर्यप्रकाशात होणाऱ्या प्रतिक्रियांमधून हा वायू तयार होतो. पृष्ठभागावरील ओझोन शहरी भागातच साचत नाही, तर ते लांब अंतरावर पसरू शकते आणि प्रादेशिक प्रदूषक बनू शकते. त्याचा कृषी उत्पादकतेवरही परिणाम होतो. त्यामुळे अन्नसुरक्षेला धोका निर्माण होतो. 'सीएसई'च्या स्वच्छ हवा कार्यक्रमाच्या कार्यकारी संचालक आणि प्रमुख अनुमिता रॉयचौधरी म्हणतात की, नियंत्रण ठेवले नाही, तर हे एक गंभीर सार्वजनिक आरोग्य संकट बनू शकते. कारण ओझोन हा एक अत्यंत प्रतिक्रियाशील वायू आहे आणि अल्पकालीन संपर्कातदेखील मानवासाठी हानिकारक असू शकतो. उत्तर भारतातील शहरांमध्ये उन्हाळ्याच्या तीव्र उष्णतेमुळे आणि तेजस्वी सूर्यप्रकाशामुळे ओझोनची पातळी वाढते; परंतु उष्ण हवामान असलेल्या शहरांमध्ये, इतर ऋतूंमध्ये हिवाळा आणि वसंत ऋतूमध्येही हा अतिरेक सातत्याने दिसून येतो. ओझोन नियंत्रणासाठी वाहने, उद्योग आणि सर्व प्रकारच्या ज्वलन स्रोतांद्वारे उत्सर्जित होणाऱ्या अनेक वायूंवर कठोर नियंत्रण आवश्यक आहे.

'सीएसई'च्या पुनरावलोकनात असेही आढळून आले की, पृष्ठभागावरील ओझोन श्वसनमार्गात जळजळ निर्माण करते. यातून संसर्ग होण्याची शक्यता वाढू शकते. त्यामुळे दमा, क्रॉनिक ब्राँकायटिस आणि एम्फिसीमासारखे श्वसन रोग होऊ शकतात. मुले, वृद्ध आणि अविकसित फुप्फुसे असलेले लोक जास्त असुरक्षित असतात. ओझोनच्या संपर्कात आल्याने वारंवार दम्याचे झटके येतात. ओझोन हा अतिशय जलद प्रतिक्रिया देणारा वायू असल्याने मोजणीसाठी २४ तासांऐवजी आठ तासांची सरासरी मर्यादा निश्चित करण्यात आली आहे.पृष्ठभागावरील ओझोन प्रदूषण अत्यंत परिवर्तनशील आणि स्थानिक आहे आणि ते ठिकाणानुसार बदलते. ओझोननिर्मिती जटिल रासायनिक प्रक्रिया आणि प्रकाश-रासायनिक अभिक्रियांवर अवलंबून असते. त्यामुळे त्याची पातळी वेळ आणि स्थानानुसार बदलते. सूर्यप्रकाश, उष्ण हवामान आणि स्थिर वारे त्याच्या निर्मितीमध्ये भूमिका बजावतात. या अभ्यासात महानगरातील प्रत्येक स्थानकावर मानक ओलांडले गेलेल्या दिवसांचा मागोवा घेतला गेला. शहरातील एका स्थानकानेदेखील मानक ओलांडले, तर ते त्या शहरासाठी 'मानक उल्लंघन' मानले जाते. एकाच दिवशी अनेक स्थानके मानक ओलांडली, तर ते प्रदूषण किती मोठ्या प्रमाणात पसरले आहे आणि किती लोक प्रभावित होत आहेत हे सांगते. या अभ्यासात आंतरराष्ट्रीय मानकांनुसार 'यूएस ईपीए'ची पद्धत स्वीकारण्यात आली आहे. याअंतर्गत दिवसाच्या प्रत्येक आठ तासांच्या सरासरी ओझोनपातळीची गणना केली जाते आणि त्यापैकी सर्वोच्च मूल्य त्या दिवसाची ओझोन पातळी मानले जाते. 'यूएस ईपीए'नुसार शहर किंवा प्रदेशाचा 'एक्यूआय' त्या दिवशी सर्व स्थानकांवर नोंदवलेल्या सर्वोच्च मूल्याच्या आधारे निश्चित केला जातो. यंदाच्या उन्हाळ्यात १ मार्च ते ३१ मे दरम्यान मुंबईत ९२ पैकी ३२ दिवस ओझोनचे उल्लंघन नोंदवले गेले. गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत हे ४२ टक्के घट दर्शवते.२९ मार्च हा सर्वात वाईट दिवस ठरला. या दिवशी शहरातील ३१ पैकी ८ निरीक्षण केंद्रांनी ओझोनची पातळी प्रमाणापेक्षा जास्त नोंदवली. या कालावधीत मुंबईत चकाला येथे प्रादेशिक कमाल पृष्ठभागावरील ओझोन सांद्रता ९० मायक्रोग्राम प्रति घनमीटर इतकी होती. तिथे मार्च ते मे दरम्यान २९ दिवस ओझोन मानकांचे उल्लंघन झाले. पृष्ठभागावरील ओझोनचे वितरण सामान्यतः नायट्रोजन डायऑक्साइड (एनओ)सह उलट संबंध दर्शवते. विशेषतः जास्त रहदारी असलेल्या भागात नायट्रोजन ऑक्सिजनची पातळी जास्त असते, तिथे ओझोनची निर्मिती बहुतेकदा कमी असते. कारण ओझोन 'नायट्रिक ऑक्साईड'शी प्रतिक्रिया देतो आणि विरघळतो. शहराच्या वेगवेगळ्या भागात ओझोनची पातळी विविध घटकांमुळे बदलते; जसे की इतर प्रदूषकांचे परिणाम, हवामान आणि उत्सर्जन स्रोत. मे २०२५ ची तुलना मे २०२४ शी केल्यास पृष्ठभागावरील ओझोन सूर्यास्तानंतर जास्त काळ वातावरणात राहतो, असे आढळते. तथापि, २०२५ च्या उन्हाळ्यात सरासरी तासाला कमाल ओझोन सांद्रता मागील वर्षाच्या तुलनेत ३५ टक्के कमी होती. जी वातावरणातील रसायनशास्त्रात बदल किंवा ओझोन तयार करणाऱ्या पूर्वसूचक प्रदूषकांच्या उत्सर्जनात घट दर्शवते.दैनंदिन ट्रेंड दर्शवतात की, सकाळी आणि संध्याकाळी नायट्रोजन ऑक्सिजनची पातळी जास्त असते, तेव्हा ते ओझोनला निष्क्रिय करण्यास आणि विखुरण्यास मदत करते; परंतु नायट्रोजन ऑक्सिजनची पातळी तुलनेने कमी असते तेव्हा दुपारी किंवा कमी गर्दीच्या वेळेत ओझोनची पातळी वाढते. मुंबईत हिवाळ्यात (डिसेंबर ते फेब्रुवारी) पृष्ठभागावरील ओझोन पातळी जास्त असते. २०२४-२५ च्या हिवाळ्यात शहरात ८७ दिवसांसाठी ओझोन पातळी प्रमाणापेक्षा जास्त होती. गेल्या वर्षीच्या हिवाळ्याच्या तुलनेत त्यात दहा टक्क्यांनी वाढ झाली आहे. कोलकातामध्ये ९२ पैकी सुमारे २२ दिवस ओझोन पातळी प्रमाणापेक्षा जास्त होती. गेल्या वर्षीच्या उन्हाळ्याच्या तुलनेत हे ४५ टक्के घट दर्शवते. या उन्हाळ्यात सरासरी तासिक ओझोन कमाल पातळी देखील २२ टक्क्यांनी कमी झाली. हे एकूण सुधारणा दर्शवते. कोलकातामध्ये हिवाळ्यात (नोव्हेंबर ते फेब्रुवारी) पृष्ठभागावरील ओझोन सांद्रता सातत्याने जास्त नोंदवली गेली. ही प्रवृत्ती वातावरणीय परिस्थिती, तुलनेने उष्ण हवामान, प्रकाश रासायनिक अभिक्रिया आणि उत्सर्जन पातळीमुळे आहे. या वर्षी १ मार्च ते ३१ मे या कालावधीत ९२ पैकी ४५ दिवसांसाठी बंगळूरुमध्ये ओझोनची पातळी हवेच्या गुणवत्तेच्या मानकांपेक्षा जास्त होती. गेल्या वर्षीच्या उन्हाळ्याच्या तुलनेत ही २९ टक्के वाढ आहे. मार्च ते मे २०२५ दरम्यान ३१ दिवसांसाठी ओझोनची पातळी मानकांपेक्षा जास्त होती.हैदराबादमधील हवेच्या गुणवत्तेचे निरीक्षण केंद्रांनी या वर्षी १ मार्च ते ३१ मे दरम्यान सामान्य ओझोन पातळीपेक्षा २० दिवस जास्त नोंदवले. गेल्या वर्षीच्या तुलनेत ही ५५ टक्के घट आहे. बोलारम हे हैदराबादमधील सर्वात जास्त प्रभावित क्षेत्र आहे, जिथे मार्च ते मे दरम्यान १७ दिवस सामान्य ओझोन पातळीपेक्षा जास्त होते. १ मार्च ते ३१ मे या काळात चेन्नईमध्ये ९२ पैकी १५ दिवस ओझोनची पातळी मानकांपेक्षा जास्त नोंदवली गेली, असे शहराच्या हवा गुणवत्ता निरीक्षण केंद्रांच्या आकडेवारीवरून दिसून येते. २०२३ च्या उन्हाळ्यात तीन दिवस आणि २०२२ मध्ये १९ दिवस ओझोनचे उल्लंघन नोंदवले गेले. अलंदूर हे चेन्नईमधील सर्वात जास्त प्रभावित क्षेत्र आहे. मार्च ते मे दरम्यान येथे १५ दिवस मानकांपेक्षा जास्त पातळी नोंदवली गेली. शहरातील इतर स्थानकांवर कोणतेही उल्लंघन नोंदवले गेले नाहीत. सध्या भारतातील मोठी शहरे प्रदूषणाच्या झळा सोसत आहेत.

# भाजपमध्ये इनकमिंग जोरात; पण प्रकल्प अपूर्णच



नाशिकमध्ये भारतीय जनता पक्षात मोठ्या प्रमाणात इनकमिंग सुरू आहे. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकीत भाजपची ताकद मोठ्या प्रमाणावर नक्कीच वाढली आहे. असे असले तरीही, नाशिकमध्ये चालू असलेले अनेक प्रकल्प बऱ्याच वर्षांपासून रखडलेले आहेत. भाजपची ताकद जरी वाढली असली तरी फक्त मतदारसंघ व निवडणुकांच्या दृष्टीमुळे अनेक विकासकामे रखडली आहेत, याबाबत घेतलेला विशेष धांडोळा...

प्रकल्प पूर्ण करण्यासाठी नाशिकचे नेतृत्व पुढे येण्यास संधी देणार का? नाशिकचे नेतृत्व असेल तर नाशिकचे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले प्रश्न सुटण्यास मदत होईल. भाजप आता हाऊसफुल्ल झाले आहे. म्हणजे त्यांना १०० जागा जिंकण्यासाठी आवश्यक असलेला सक्षम उमेदवारांचा कोटा पूर्ण झाला आहे. निवडणुकीत लोक कदाचित भाजपला मागील निवडणुकांप्रमाणे मतदानही करतील. पण मतदारांच्या पदरात काय पडणार हा खरा प्रश्न आहे. नाशिकचे प्रश्न सोडवण्यासाठी भाजपच्या राज्य व राष्ट्रीय नेतृत्वाने नाशिकमधून नेतृत्व पुढे येण्यासाठी रस्ता मोकळा करण्याची गरज आहे. नाशिकचे नेतृत्व पुढे येऊ द्यायचे नाही व केवळ नाशिककरांची मते घ्यायची, ही बाब अन्यायकारक आहे. लोकशाहीत त्या भागाच्या विकासासाठी तेथील स्थानिक नेतृत्व सक्षम असणे फार गरजेचे असते.

नाशिकमध्ये भारतीय जनता पक्षात मोठ्या प्रमाणात इनकमिंग सुरू आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी भाजपची ताकद नक्कीच वाढली आहे. नाशिक शहरात तिन्ही भाजपच्या आमदारांनी हॅटट्रिक मारली आहे, परंतु नाशिकचे नेतृत्व पुढे येत नसल्याने आयटी प्रकल्प, नाशिक-पुणे रेल्वे मार्ग, न्यूओ मेट्रो, नमामी गंगा यासारखे अनेक प्रकल्प पूर्ण होत नसल्याची खंत नाशिककरांमध्ये आहे. मंत्रभूमी म्हणून प्रसिद्ध असलेली नाशिक नगरी प्रथमच तंत्र भूमीकडे जोरदारपणे वाटचाल करत आहे. मुंबई-पुण्याच्या सुवर्ण त्रिकोणातील नाशिक शहर गेल्या काही वर्षांपासून सर्व क्षेत्रात आघाडी घेत आहे. प्रभू श्रीरामचंद्रांची पावनभूमी असलेली नाशिक नगरी सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी देखील प्रसिद्ध आहे. बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक भगवान त्र्यंबकेश्वर, साडेतीन शक्तिपीठांपैकी सप्तशृंगी निवासिनी मंदिर जिल्ह्याचे अध्यात्मिक शक्ती स्थळे आहेत. उद्योग क्षेत्रातही नाशिक आता उत्तुंग अशी भरारी घेत आहेत. काही दिवसांपासून भारतीय जनता पक्षात उबाठा, राष्ट्रवादी (शरद पवार)सह इतर काही पक्षातून पदाधिकारी, कार्यकर्ते प्रवेश करत आहेत. त्यामुळे आगामी महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांसाठी भाजप शक्तिमान नक्कीच झाला आहे. नाशिकच्या इतिहासात २०१७ मध्ये महापालिकेत भाजपाचे तब्बल ६६ नगरसेवक विजयी होत पक्षाने एकहाती सत्ता आणली होती. विधानसभेत देखील जिल्ह्यात भाजपचे ५ आमदार, तर शहरातील तिन्ही विधानसभा जागांवर भाजपने बाजी मारली आहे. त्यामुळे नाशिकला मंत्रीपद मिळेल अशी अपेक्षा यंदाही फोल ठरली आहे. त्यामुळे नाशिकचे प्रश्न विधिमंडळात मांडले जात नाहीत. पाचही आमदार आपल्या परीने पोटतिडिकीने प्रश्न मांडत आहेत.गेल्या विधानसभा निवडणूक प्रचारात ज्येष्ठ नेते देवेंद्र फडणवीस यांनी नाशिक दत्तक घेतले असल्याची घोषणा देखील केली होती. त्यानुसार नाशिकचा विकास होत आहे, परंतु अपेक्षित असे प्रकल्प वर्षानुवर्ष मार्गी लागत नसल्याने नागरिकांमध्ये काहीशी नाराजी आहे. महापालिकेच्या दृष्टीने प्रत्येक प्रभागातील स्ट्राँग उमेदवार भाजप शोधत आहे. आपल्या पक्षात नसेल तर विरोधी पक्षाचा पदाधिकारी, कार्यकर्त्यांना गळ लावली जात आहेत. त्यामुळे भारतीय जनता पक्ष नाशिक जिल्ह्यात क्रमांक १ चा राहील, यात शंका नाही. परिणामी विरोधकांची पायाखालची वाळू सरकली आहे.संपूर्ण देशात गेल्या अकरा वर्षांत खूप प्रगती झाली. अनेक प्रकल्प मार्गी लागले. केंद्र सरकारने १०० लाख कोटी खर्च करण्याचा संकल्प केला. पण त्यातील किती प्रकल्प नाशिकला आले? त्यातून नाशिकचे किती रेंगाळलेले प्रकल्प मार्गी लागले? एकही नाही. कारण केंद्रातील व राज्यातील सरकारकडे मतदारसंघाच्या संकुचित चष्म्यापलीकडे बघणारे नेतृत्व भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाने विकसित होऊ दिले नाही हे प्रमुख कारण आहे.


# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या नावाची मुख्याध्यापक व संस्था चालक यांना ऍलर्जी


## अण्णाभाऊ साठे इंग्लिश स्कुलची चौकशी करून जातीयवादी मानसिकता असलेले संस्था चालक,मुख्याध्यापक यांच्या अट्रॉसिटी एक्ट नुसार गुन्हा दाखल करा-डॉ.संजय नाकालगावंकर

**बीड । प्रतिनिधी**

आण्णाभाऊ साठे इंग्लिश स्कुल ही संस्था मौजे दिंदूड ता. माजलगांव जि.बीड या ठिकाणी कार्यरत नसून ती फक्त कागदोपत्री चं दाखवण्याचा प्रयत्न आहे. सदरील संस्था हि दिलीप पारेकर यांची असुन याच ठिकाणी त्यांची अन्य अनधिकृत अमान्यता प्राप्त संस्था खोलेश्वर विद्यालय, दिंदूड आहे.साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांच्या नावाची लाज वाटते की काय अशा प्रकारची संस्थेची वागणूक दिसत आहे.जातिवादी मानसिकता असलेल्या मुख्याध्यापक व संस्थाचालकावर ट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करा. जसे की, विद्यार्थ्यांचे ओळखपत्र आण्णाभाऊ साठे इंग्लिश स्कूलचे न वापरता खोलेश्वर विद्यालयाचे वापरले जाते. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना ने-आण करण्यासाठी ज्या बसेस आहेत त्यांनाही आण्णाभाऊ साठे इंग्लिश स्कुल नाव न वापरता खोलेश्वर विद्यालय असेच नाव बसेसवर वापरले जाते. विद्यार्थ्यांच्या गणवेशावरही आण्णाभाऊ साठे असे नाव न वापरता खोलेश्वर विद्यालय असेच नाव व लोगो आहे.

सदरील परिस्थीती पाहता शाळेचे संस्थाचालक व शाळेचे मुख्याध्यापक हे जातीयवादी मानसिकतेचे आहेत काय? असा प्रश्न निर्माण होतो. साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांचे नाव वापरण्यास यांना एवढी का लाज वाटावी ही गंभीर बाब आहे. गटशिक्षणाधिकारी यांनी सदरील प्रकरणाची तात्काळ चौकशी करून योग्य ती कार्यवाही करावी अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या कार्यालयाची राहिल याची नोंद या संस्थाचालक व मुख्याध्यापकावर कारवाई व्हावी यासाठी गटशिक्षणाधिकारी माजलगाव यांच्याकडून निवेदन देण्यात आले आहे.






# पिंपरखेड जाम मस्जिद प्रकरणी दोशींवर तात्काळ गुन्हे दाखल करा

## अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करू-सय्यद सलीम बाबू

**बीड । प्रतिनिधी**

मौजे पिंपरखेड तालुका वडवणी येथील जमा मस्जिद प्रकरणी दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल करून कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी तारिक - ए - इनाम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी केली आहे.

असे की,मोजे पिंपरखेड तालुका वडवणी येथे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ अंतर्गत येणारी महाराष्ट्र शासन राजपत्र अनु.क्र ४५ पान क्रमांक ५४ - ५५ नुसार नोंदणीकृत जामा मस्जिद धार्मिक संपत्ती असून सदरील जामा मस्जिद ही गावातील एकमेव मस्जिद आहे तरी याच गावातील शेख महमूद शेख गफूर,शेख जाफर शेख गफूर,शेख पाशा शेख गफूर,शेखलील शेख गफूर या चौघ भावाने मिळून काही वर्षांपूर्वी मस्जिद पाडून मस्जिद माळवत चे लाकूड,माती व जागा विकण्याचे काम केले होते.



तरी सदरील प्रकरणी मस्जिद खेदमत बहाल यांच्या अर्ज नुसार मा.जिल्हा वक्फ अधिकारी यांनी वेळोवेळी पोलीस निरीक्षक साहेब, पोलीस ठाणे वडवणी यांना वरील गुंड प्रवृत्तीच्या लोकांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ औरंगाबाद यांचे पत्र क्रं./३७४ /२०१५ दिनांक २१/०१/२०१५, जिल्हा वक्फ कार्यालय बीड यांचे पत्र क्रं. एसएनटी/५२७/२०२० दिनांक १३/१०/२०२० व जा.क्र. वक्फ/एसएनटी विभाग-२५६/४१/२०२४ दिनांक २३/०२/२०२४ प्रमाणे पत्रव्यवहार केला होता. तरी सदरील प्रकरणी वरील लोकांवर अद्यापही कसलीही कार्यवाही करण्यात आली नसून वरील गुंड प्रवृत्तीचे लोक हे मस्जिद च्या मालकी संपत्तीवर अवैध प्रकारे कब्जा करण्याचा प्रयत्न करीत आहे.

तरी वरील प्रकरणी गावातील शेख महमूद शेख गफूर,शेख जाफर शेख गफूर,शेख पाशा शेख गफूर,शेखलील शेख गफूर या चौघ भावांवर गुन्हे दाखल करून कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी अन्यथा तारिक - ए - इनाम संघटनेच्या वतीने जिल्ह्यावर तीव्र स्वरूपाचे लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल असे तारिक - ए - इनाम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी प्रसिद्धी माध्यमांना दिलेल्या पत्रकात नमूद केली आहे.

## सरकारचा पैसा आहे, आपल्या बापाचं काय जातंय!

# संजय शिरसाट यांचे आणखी एक वादग्रस्त विधान; पुन्हा राजकारण तापण्याची शक्यता

**अकोला (वृत्तसंस्था)**-राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट पुन्हा एकदा त्यांच्या वादग्रस्त विधानामुळे चर्चेत आले आहेत. अकोल्यात आयोजित एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी सरकारचा पैसा आहे, आपल्या बापाचं काय जातंय? असे वक्तव्य केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. त्यांच्या या वक्तव्यामुळे पुन्हा एकदा राजकारण तापण्याची शक्यता आहे.काही दिवसांपूर्वीच संजय शिरसाट यांच्या एका व्हिडीओमुळे वाद निर्माण झाला होता, ज्यामध्ये ते एका खोलीत अर्धनग्न अवस्थेत बसले होते आणि त्यांच्या बाजुला पैशांची बॅग दिसत होती. तसेच राज्यात मंत्र्यांच्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे सरकार अडचणीत सापडत असल्याचे चित्र दिसत आहे. काही दिवसांपूर्वीच मुख्यमंत्र्यांनी मंत्र्यांना संयमित आणि जबाबदारीने बोलण्याची ताकीद दिली होती. तसेच खाते बदलासारखे निर्णयही घेतले गेले. मात्र तरीही मंत्र्यांच्या वागणुकीत फारसा फरक पडताना दिसत नाही.

अकोला शहरातील निमवाडी परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाच्या नूतन वास्तूचे लोकार्पण सामाजिक न्याय मंत्र्यांच्या हस्ते झाले. यावेळी भाषणादरम्यान त्यांनी 'आपल्या भागातील वसतिगृहासाठी निधीची मागणी करा. वसतिगृहाला पाच, दहा, पंधरा कोटींचा निधी लागत असेल तरी तो मागा. नाही दिला तर नाव सांगणार नाही. सरकारचा पैसा आहे, आपल्या बापाचं काय जातायं?.' असे विधान बेधडकपणे केले.मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर प्रथम राज्यातील वसतिगृहाची पाहणी केली होती. खेड्यापाड्यातून शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहांची सुविधा अधिक व चांगल्या प्रमाणात असणे गरजेचे आहे. गोरगरीब विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे शिक्षण व सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून राज्यात १२० वसतिगृहे उभारण्यात येणार आहेत. त्यासाठी एक हजार २०० कोटी रुपयांच्या निधीची तरतुदही करण्यात आली आहे, अशी माहिती राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिली.मंत्री संजय शिरसाट यांच्या अडचणी संपता संपण्याची चिन्हे दिसत नाहीत. मागील काही दिवसांपासून संजय शिरसाट हे वेगवेगळ्या कारणांनी चर्चेत आले आहेत. नुकतीच त्यांनी आपल्या खात्याला निधी मिळत नसल्याचे सांगत अजित पवार यांच्याविरोधात जाहीर नाराजी व्यक्त केली होती. शिवाय राज्याच्या सामाजिक न्याय विभागाच्या कामकाजावर सध्या भाजपच्या आमदारांतून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. मंत्री संजय शिरसाट यांच्या नेतृत्वाखालील या विभागाची कार्यशैली आणि निर्णय प्रक्रियेतील विलंब यावर भाजपच्या काही आमदारांनी थेट राज्य नेतृत्वाकडे नाराजी नोंदवली आहे.

# लायन्स क्लब व लिओ क्लब ऑफ अहमदनगर यांचा पदग्रहण सोहळा पार

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

समाजातील गरजूंना आधार देण्याचे काम लायन्स क्लब करत आहे. समाजातील सर्व घटक लायन्सच्या सामाजिक चळवळीशी जोडले गेले असून, शेवटच्या घटकांपर्यंत सेवा देण्याचे कार्य सुरु आहे. लायन्सच्या माध्यमातून समाजात सत्पात्री दान होत असल्याची भावना लायन्सचे द्वितीय प्रांतपाल राजेंद्र गोयल यांनी व्यक्त केली.अहिल्यानगर शहरातील लायन्स क्लब ऑफ अहमदनगर व लिओ क्लब ऑफ अहमदनगर यांचा संयुक्तिक पदग्रहण सोहळा उत्साहात पार पडला. या पदग्रहण सोहळ्यात अध्यक्षीय भाषणात राजेंद्र गोयल बोलत होते. नगर-मनमाड रोड येथील एका हॉटेल मध्ये झालेल्या या पदग्रहण सोहळ्यात लायन्सच्या अध्यक्षपदाची सूत्रे डॉ. संजय असनानी व लिओ क्लबच्या अध्यक्षपदाची सूत्रे गुरनूरसिंग वधवा यांनी स्विकारली. या सोहळ्यासाठी किरण भंडारी, प्रशांत मनोत, अरविंद पारगावकर, डॉ. अमित बडवे, जस्मितसिंग वधवा, दिलीप कुलकर्णी, प्रणिता भंडारी, धनंजय भंडारे, हरीश हरवाणी, डॉ. मानसी असनानी, अंजली कुलकर्णी, सीए शंकर अंदानी, राजू जग्गी, अनिश आहुजा, किशोर रंगलानी, डॉ. प्रिया मुनोत, प्रिया रंगलानी, रुचिता कुमार, तनिष्क जग्गी, रीत जाजू, आरोही कांगे, पुणे येथील झेड सी विपिन शेठ, सनी वधवा, गगनप्रीत कौर वधवा, किशोर किथानी, मोहित किथानी, आदींसह लायन्स व लिओ क्लबचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रारंभी पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. अंजली कुलकर्णी यांनी गणेश वंदना सादर केली. पाहुण्यांच्या स्वागत किरण भंडारी यांनी केला. लायन्सक्लबच्या सचिवपदी प्रशांत मनोत, खजिनदारपदी दिलीप कुलकर्णी यांची तर लिओ क्लबच्या सचिवपदी हर्ष किथानी व




खजिनदारपदी जगज्योत बग्गा यांची नियुक्ती जाहीर करुन त्यांना पदाची सुत्रे सोपविण्यात आली. राजेंद्र गोयल यांनी नूतन पदाधिकारी कार्याची जबाबदारी समजावून व पदाची शपथ दिली. तर नव्याने लायन्स क्लबमध्ये सदस्यत्व घेतलेल्यांना लायन्स लायनिझमची माहिती दिली.डॉ. संजय असनानी म्हणाले की, लायन्स क्लब ऑफ अहमदनगरच्या माध्यमातून विविध माध्यमातून सेवा कार्य सुरु आहे. कोरोना काळापासून सुरु करण्यात आलेल्या लंगर सेवेत लायन्सचे महत्त्वाचे योगदान राहिले असून, ती सेवा आजही सुरु असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. लायन्सच्या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देऊन आधार दिला जाणार आहे. तर वंचित घटकातील नागरिकांना आरोग्य सेवा मोफत देण्यासाठी विविध शिबिर घेतले जाणार असून, पर्यावरण संवर्धनासाठी देखील विविध उपक्रम घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. गुरनूरसिंग वधवा यांनी युवक-युवतींच्या सक्षमीकरणासाठी व सामाजिक कार्यात युवकांना जोडण्यासाठी सामाजिक उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त केला.लायन्सच्या माजी अध्यक्षा स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. सिमरनकौर वधवा यांनी गोवा ते हैदराबाद विमान प्रवासात ३५ हजार फूट उंचीवर एका महिलेचे प्राण वाचवून त्यांनी दाखवलेली तत्परता, वैद्यकीय कुशलता आणि मानवतेची जाणीवेबद्दल त्यांचा या कार्यक्रमात गौरव करण्यात आला. लायन्स क्लबच्या युथ एक्सचेंज उपक्रमातंर्गत स्पेन मधून अहिल्यानगर शहरात आलेल्या मारथा ब्रियोनिस व मॅन्युअल रॉड्रिक्स हे देखील या पदग्रहण सोहळ्यात सहभागी झाले होते.लायन्सच्या मावळत्या अध्यक्षा डॉ. अनघा पारगावकर व लिओ क्लबच्या अध्यक्षा रिधिमा गुंदेचा यांनी मागील वर्षात राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमाची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संतोष माणकेश्वर, ओम भंडारी यांनी केले. आभार हरजितसिंह वधवा यांनी मानले.

## करमाळा पोलिसांची धडाकेबाज कारवाई

# ११ लाख २१ हजार रुपयांचा सुगंधित तंबाखू व गुटखा जप्त, आरोपी अटक

**सोलापूर । प्रतिनिधी**

पीकरमाळा पोलिसांनी अवैधरीत्या वाहतूक होत असलेला सुगंधित तंबाखू व गुटख्याचा मोठा साठा जप्त करून आरोपीला अटक करण्यात यश मिळवले आहे. या कारवाईत तब्बल ११ लाख २१ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक २८ जुलै २०२५ रोजी रात्री गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अमलनगर येथे पेट्रोलिंग करीत असताना गुप्त माहितीदारामार्फत माहिती मिळाली की एक महिंद्रा कंपनीचे वाहन गुटखा-सुगंधित तंबाखू वाहतूक करीत आहे. त्यानंतर पोलिस निरीक्षक रत्नजित माने यांना माहिती मिळाल्यानंतर त्यांनी तातडीने गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाला सूचना देऊन वाहनाबाबत माहिती घेऊन सापळा रचला. रात्री १.३० वाजण्याच्या सुमारास अमलनगर येथे वाहनाला थांबवून तपासणी करण्यात आली. वाहन क्रमांक चक२० ऋग ७२४६ असलेल्या वाहनाची तपासणी केल्यानंतर वाहनात गुटखा व सुगंधित तंबाखू मोठ्या प्रमाणात आढळून आला. त्यामध्ये २ लाख १४ हजार ५०० रुपयांचा १३० किलो वजनाचा पानमसाला १६५० पाकिटे, १ लाख ७ हजार २५० रुपयांचा ६५ किलो वजनाचा गुटखा ७१४ पाकिटे तसेच ८ लाख रुपयांचे वाहन असा एकूण ११ लाख २१ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल मिळून आला.


या प्रकरणी पोलिसांनी राजेंद्र विनायक वाघमारे (वय ४०, रा. देबळाई, ता. जिंतूर, जि. परभणी) यास अटक केली असून त्याच्याविरोधात करमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीविरुद्ध जिल्हा अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार कलम २६(२)(१), २६(२)(२), २७(३)(६) अन्वये कारवाई करण्यात आली आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. प्रविण जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत करमाळा पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक रत्नजित माने, पोलीस नाईक अनिल शिंदे तसेच पथकातील इतर कर्मचाऱ्यांनी मोलाची भूमिका बजावली.या कारवाईमुळे करमाळा तालुक्यात मोठ्या प्रमाणात अवैधरीत्या होणाऱ्या सुगंधित तंबाखू व गुटख्याच्या वाहतुकीला मोठा धक्का बसला आहे.

# महसूल विभागातील उत्कृष्ट कर्मचाऱ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयात सन्मान

## मंडल अधिकारी अनिता भामरे ठरल्या विशेष आकर्षण

**धुळे । प्रतिनिधी**

धुळे जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात महसूल विभागातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकाऱ्यांचा व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांच्या हस्ते या सप्ताहाचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला. यावेळी महसूल संवर्गातील निष्ठावान, जबाबदार आणि कार्यतत्पर कर्मचाऱ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजिज शेख, अपर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश इंगळे, निवासी उपजिल्हाधिकारी गंगाराम तळपाडे, उपजिल्हाधिकारी संदीप पाटील, संजय बागडे, बालाजी क्षीरसागर, उपविभागीय अधिकारी शरद मंडलिक, तसेच तहसीलदार पंकज पवार, महेंद्र माळी, प्रवीण चव्हाणके, साहेबराव सोनवणे,



अनिल गवांदे आदी मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमात शिंदखेडा तालुक्यातील शेवाडे येथील मंडल अधिकारी श्रीमती अनिता भामरे यांना त्यांच्या कर्तव्यदक्ष, पारदर्शक व लोकाभिमुख कामगिरीबद्दल विशेष प्रमाणपत्र देऊन जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. ग्रामीण भागातील महसूल कामकाजात शिस्तबद्धतेचा आदर्श निर्माण करणाऱ्या अनिता भामरे यांनी वेळेवर शेतजमिनीचे फेरफार, वारसनोंदणी आणि जमीन मोजणी यांसारख्या प्रक्रिया प्रभावीपणे पूर्ण करत नागरिकांचा विश्वास संपादन केला आहे.नागरिकांना वेळेत आणि पारदर्शक सेवा देणं हेच आपल्या प्रशासनाचं प्रमुख ध्येय असून महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी हे लक्षात घेऊन कार्य केले पाहिजे, असे आवाहन जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी यावेळी केले.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महसूल विभागाच्या टीमचे विशेष योगदान राहिले. सन्मानित अधिकाऱ्यांमध्ये अनिता भामरे यांचे कार्य विशेष ठसठशीतपणे उठून दिसले असून त्यांच्या कार्यक्षमतेचे, समर्पित वृत्तीचे आणि जनतेशी असलेल्या सकारात्मक संवादाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# अल्ट्राटेक सिमेंट कंपनीच्या वाहनामुळे रहदारीस अडथळा

## परळी-धर्मापुरी रस्त्यावर अवजड वाहतूकीच्या रांगा;सिमेंट कंपनीने स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था करावी जनसंग्राम संघटचे संस्थापक तुळशीराम पवार यांची मागणी

**परळी | प्रतिनिधी**

अल्ट्राटेक सिमेंट कंपनी पासून परळी-धर्मापुरी रोडवर १ ते २ किलोमीटर पर्यंत अवजड वाहनाच्या रांगा लागत आहेत. यामुळे रहदारीस मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होत असून या वाहनामुळे अपघात होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. सिमेंट कंपनीने त्यांच्या वाहनासाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था करावी अशी मागणी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे जनसंग्राम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तुळशीराम पवार यांनी केली आहे.याबाबत प्रसिद्ध झालेल्या पत्रकात जनसंग्राम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तुळशीराम पवार यांनी म्हटले आहे की, परळी धर्मापुरी रोडवर मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. परंतु अल्ट्राटेक सिमेंट कंपनीची सिमेंट वाहतूक करणारी ट्रक तसेच इतर वाहने रस्त्याच्या कडेला उभी असतात. अक्षरशा एक ते दोन किलोमीटर पर्यंत वाहनाच्या रांगा लागतात. सदरील अवजड वाहनामुळे रहदारीस मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होत आहे. वाहनधारकांना विशेष दुचाकीस्वरांना अक्षरशा जीव मुठीत घेऊन येथून प्रवास करावा लागत आहे. या वाहनामुळे अपघात होण्याची शक्यता ही निर्माण झाली आहे. सिमेंट कंपनी व्यवस्थापकांनी कंपनीच्या वाहनासाठी स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था करावी जेणेकरून वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही. व वाहतूक व्यवस्था सुरळीत होईल. आठ ते दहा दिवसांमध्ये जर कंपनीने स्वतंत्र पार्किंग व्यवस्था निर्माण केली नाही. तर या प्रश्नी लवकरच तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशाराही जनसंग्राम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तुळशीराम पवार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.



### मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना भेटणार?

**परळी -धर्मापुरी रोडवर असलेल्या सिमेंट फॅक्टरी च्या वाहनामुळे रहदारीस मोठ्या प्रमाणात वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. सदरील वाहनामुळे मोठे अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. येत्या आठ ते दहा दिवसात सिमेंट फॅक्टरी व्यवस्थापकांनी स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था निर्माण केली नाही तर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन निवेदन देणार असल्याचेही जनसंग्राम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तुळशीरामजी पवार यांनी म्हटले आहे.**

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बोरीसावरगाव येथे रक्तदान शिबिर




**केज | प्रतिनिधी**

तालुक्यातील बोरीसावरगाव येथे साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर घेण्यात आले या सामाजिक उपक्रमात अनेक रक्तदात्यांनी रक्तदान केले. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती बोरीसारगाव चे सरपंच वैजनाथ रामभाऊ देशमुख उपसरपंच बाळकृष्ण रामलिंग यादव माजी उपसरपंच अंगद श्रावण पोळ ग्राम सदस्य अक्षय रावन पोळ ग्राम सदस्य विनोद सटवा पोळ ग्राम सदस्य गंगाधर अंबादास पौळ जालिंदर पोळ योगेश प्रकाश देशमुख ज्योतीभाऊ मुळे राजपाल भैया काकडे रक्तदान शिबिर आयोजन वीर फकीरा ग्रुप ने केले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष सुरज कुंडलिक पोळ उपाध्यक्ष दत्ता नंदू राव पौळ सचिव सत्यजित महादेव पोळ खजिनदार साई बजरंग पोळ ,कार्यक्रमाचे सल्लागार अंगद श्रावण पोळ अजय भिवाजी पोळ गोविंदा तुळशीराम पोळ दत्ता मारुती पोळ नितीन बापू पोळ प्रकाश धनराज पोळ आकाश धर्म पोळ राहुल संतोष पोळ राहुल ज्ञानोबा पोळ बालाजी बापू वाघमारे आकाश हरिभाऊ पोळ कुलदीप रमेश पोळ कुणाल गुरुरोबा पौळ आदींनी केले.सामाजिक उपक्रमाने जयंती साजरी केली.

## पारंपारिक भात लागवडी नंतर सातपुड्यातील शेतकरी वळतोय सुगंधित व अधिक उत्पन्न देणाऱ्या भाता कडे

**मोलगी | रविंद्र वळवी**

अक्कलकुवा तालुका हा अतिदुर्गम भागात व बहुतांश डोंगर दरीत वसलेला तालुका आहे.या तालुक्यातील नागरिकांचा प्रमुख व्यवसाय म्हणजे शेती.येथील शेती ही पावसाच्या भरवशावर होणारी व कमी उत्पन्न देणारी शेती म्हणून सर्वदुर परिचित आहे.डोंगराळ परिसर व खडकाळ जमीन ही या परिसरातील खरी ओळख आहे.या जमिनीवर येथील शेतकरी बांधव वर्षांनु वर्षापासून पारंपारिक शेती कसत आले आहेत अतिदुर्गम भागात पारंपारिक पद्धतीने पारंपारिक भाताचे बियाणे फोकुन भाताची पेरणी केली जातेय मात्र बदलत्या काळात वेळोवेळी मिळत असणारे मार्गदर्शन आणि सुविधांमुळे मात्र आता काळानुरुप बदल होत असतांना दिसु लागलाय.थोड्या फार



प्रमाणात उपलब्ध होणाऱ्या पाण्यामुळे अतिदुर्गम भागातील शेतकरी आता मात्र सुगंधित व अधिक उत्पन्न देणाऱ्या भाताच्या लागवडी कडे वळला आहे.देहेलचा काही परिसर तसेच ओघानी या परिसरात थेट मातीची चिखल मशागत करुन शेतकरी भाताच्या रोपांची लावणी करत आहे.या ज्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता शक्य आहे त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर जागोजागी भाताची लावणी करण्यात शेतकरी व महिला व्यस्त झाले आहेत.विशेष म्हणजे शेतकरी हे स्वतःच्या शेतातच भाताची रोपे तयार करीत आहेत.बदलत्या काळात सातपुड्याच्या शेतीत सातपुड्यातील शेतकऱ्यांनी काळानुरुप केलेला बदल सुखावणारा आहे.

## शंकर माध्यमिक विद्यालय साळेगाव येथे मौखिक आरोग्य तपासणी शिबिर संपन्न



**केज | प्रतिनिधी**

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.संजय राऊत सर आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ.दत्तात्रय केंद्रे सर यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय मौखिक आरोग्य अभियाना अंतर्गत दिनांक २ आगष्ट २०२५ रोजी शंकर माध्यमिक विद्यालय साळेगाव येथे उपस्थित अंदाजे ३५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांची मौखिक दंत तपासणी उपजिल्हा रुग्णालयाचे दंतशल्य चिकित्सक डॉ.रमण दळवी यांनी केली.उपस्थित विद्यार्थ्यांना दोन वेळा ब्रश करण्याचे महत्त्व, चॉकलेट,जंक फूड इत्यादींचे दुष्परिणाम काय असतात ह्या बद्दल सविस्तर समजावून सांगितले.दैनंदिन आरोग्य व समतोल आहार याचे महत्त्व समुपदेशक श्रीमती सीता गिरी यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.शाळेचे मुख्याध्यापक श्री. तांबारे सर व सर्व शिक्षक वृंद यांनी शिबिराच्या आयोजना साठी विशेष सहकार्य केले.मोठ्या प्रमाणात होत असलेल्या अशा पद्धतीच्या दंत तपासणी शिबिरामुळे शिक्षक,पालक व विद्यार्थी वर्ग समाधान व्यक्त करत आहेत.

## शारदा इंग्लिश स्कूल केजचे प्राचार्य श्री.मिश्रा सोनल महेंद्र यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाकडून पीएचडी पदवी प्रदान

**केज | प्रतिनिधी**

केज शहरातील शारदा इंग्लिश स्कूल शाळेचे प्राचार्य श्री.सोनल महेंद्र मिश्रा यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर विद्यापीठाकडून पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली.त्यांनी मालती राव,जेसिका मूर,आणि नाओइस डोलन यांच्याकाल्पनिक कथांमध्ये एक स्त्रीवादी मॅट्रिक्स या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला,तो प्रबंध मंजूर होऊन विद्यापीठातर्फे त्यांना पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली.

पीएचडी प्रदानकमिटीचे अध्यक्ष मा.प्राचार्य डॉ. मुश्तजीब खान प्रोफेसर इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर हे होते. तर बाह्य परीक्षक म्हणून श्री.एच.एम सरवदे सहाय्यक प्रोफेसर शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर हे होते.





डॉ.सोनल मिश्रा यांनी हा प्रबंध मार्गदर्शक श्री डॉ.डी.एन.गंजेवार प्राचार्य प्रल्हादराय दालमिया सायन्स कॉलेज मुंबई (माजी इंग्रजी विभाग प्रमुख व वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय किल्ले धारूर जिल्हा बीड) यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला.पीएचडी हा बहुमान मिळाल्याबद्दल श्री.सोनल मिश्रा यांची सर्वत्र कौतुक होतआहे.

श्री.सोनल महेंद्र मिश्रा यांचे प्राथमिक ते पदवीधर पर्यंतचेशिक्षण इंग्रजी माध्यमात पूर्ण झाले असून पदव्युत्तर शिक्षण त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथे इंग्रजी विषय घेऊन पूर्ण केले.प्रारंभी पासून च बुद्धीने चाणाक्ष,कष्ट व मेहनतीची तयारी व कुशल प्रशासक म्हणून त्यांची ओळख शैक्षणिक क्षेत्रात आहे.

केजशहरातील छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या शारदा इंग्लिश स्कूल या शाळेच्या स्थापनेपासूनच प्राचार्य पदाची धुरा हाती घेतली अत्यंत कमी कालावधी मध्ये सचिव श्री. रमेशरावजी आडसकर साहेब,सौ.अर्चनाताई आडसकर मॅडम यांच्या मार्गदर्शनाखालीशाळेचा बीड जिल्ह्यातच नव्हे पूर्ण राज्यामध्ये नावलौकिक केला. मिळालेल्या सन्मानाचे श्रेय श्री.रमेशरावजी आडसकर साहेब,आई, वडील परिवार व मित्र परिवार यांना देत असल्याचे सांगितले.

आगामी काळामध्ये शैक्षणिक क्षेत्रामध्ये नवनवीन संशोधन करून ग्रामीणभागातील विद्यार्थ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करेल असे आश्वासन दिले. शाळेच्या वतीने सर्व शिक्षक वृंदातर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## हरिनाम सप्ताहातुन अध्यात्मिक संस्कार व भक्ती परंपरा जतन होते-राजेंद्र मस्के

**बीड | प्रतिनिधी**

अखंड हरिनाम सप्ताहातुन नामस्मरण किर्तन भजनाची भक्ती परंपरा नवीन पिढी पर्यंत पोहचवण्याचे कार्य होते. हरिनाम सप्ताह म्हणजे सात दिवसांचा अध्यात्मिक उत्सव आहे, जो प्रत्येक व्यक्तीला अंतर्मुख करतो आणि समाजाला सकारात्मकतेचा संदेश देतो.हरिनाम सप्ताहात हरिपाठ,भागवत कथा, नामस्मरण, प्रवचन कीर्तन, भजन, आरती अन्नदान अशा भक्ती परंपरा संवर्धीत होतात.तर अध्यात्मिक संस्कार प्राप्त होतात. अखंड हरिनाम सप्ताह सामाजिक गरज आहे. असे विचार राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी पोखरी लिंबा येथे अखंड हरिनाम सप्ताह सांगता प्रसंगी उपस्थित भाविक भक्तांसी संवाद साधताना व्यक्त केले. पोखरी लिंबा हे बीड जिल्ह्यातील पोखरी गाव हे सामाजिक भान असलेले आदर्श गाव असून लोकवर्गणीतून शैक्षणिक संकुल निर्माण करणारे हे अध्यात्मिक क्षेत्रातही एक दिलाने उपक्रम राबवतात. भक्ती आणि



शिक्षणाची गुढी निर्माण करून समाधान च्या दिशेने येथील ग्रामस्थ प्रयत्नशील असतात. बंकटस्वामी मठाचे मठाधिपती महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, बेलेश्वर संस्थानचे तुकाराम महाराज भारती , राजेंद्र मस्के, व हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत काल अखंड हरिनाम सप्ताह सांगता समारोप संपन्न झाला. परिसरातील भाविक भक्तांनी मोठ्या पमाणात सहभागी झाले होते. आध्यात्मिक उपक्रम यशस्वी करण्यासाठी सरपंच बिबीशन मुळीक दत्तू दळवे, शाहू फाळके, अशोक फाळके दादासाहेब खिल्लारे, नवनाथ खिल्लारे, विष्णू साबळे, नवनाथ आडके छत्रभुज फाळके आदींनी बहु परिश्रम घेऊन हा सोहळा यशस्वी केला.

## डॉक्टर अमोल मोहळकर यांनी योग्य उपचार केल्याने गाईला मिळाले जीवदान

**पाटोद | प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील आरोग्य विभागातील अधिकारी डॉ. अमोल मोहळकर यांचा कर्तव्य दृष्टिकोन पुन्हा एकदा समोर आला आहे. पाटोदा शहरातील शेतकरी महादेव जाधव यांच्या गाईचा पाय मोडल्याची दुर्दैवी घटना घडली ही घटना पाटोदा आरोग्य विभागातील अधिकारी डॉ. अमोल मोहळकर यांना समजताच तात्काळ डॉक्टर मोळकर यांनी घटनास्थळी धाव घेत योग्य उपचार सुरू करून त्या गाईचे प्राण वाचवले.गाईच्या पायाच्या गंभीर जखमेवर डॉक्टर मोहळकर यांनी आपल्या सहकारी डॉ. हरिदास शेलार आणि डॉ. ओम गोरे यांना सोबत घेऊन शेतातच तातडीने शस्त्रक्रिया केली. अनेक तास सतत चाललेल्या उपचारांमुळे गाईची प्रकृती स्थिर झाली आणि तिचे प्राण वाचले.या मनोभावातून दिसून येते की डॉ. अमोल मोहळकर केवळ मानवतेसाठीच नव्हे, तर प्राण्यांप्रती असलेल्या प्रेमासाठीही नेहमी तत्पर असतात. शेतकरी महादेव जाधव यांनी



या डॉक्टरांच्या संवेदनशीलतेचे व समर्पित प्रयत्नांचे कौतुक केले असून त्यांना मोठा आधार मिळाल्याचे सांगितले.पाटोदा तालुक्यातील ही घटना माणुसकीच्या नवीन परिभाषा मांडते. प्राण्यांच्या आरोग्यासाठी वेळ न घालवता तातडीने मदतीसाठी धावणाऱ्या डॉ. मोहळकर आणि त्यांच्या टीमचे शहरातील शेतकऱ्यांनी विशेष आभार मानले आहेत.ही घटना वैद्यकीय मदतीची तर आहेच, पण त्याहूनही अधिक माणुसकी आणि सहृदयतेची जिवंत साक्षी आहे, जी प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077